नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/०८/२०२६ ( बुधवार )

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ९२ हजार ९१३ रूपयांचा मुद्‌देमाल जप्त पारशिवनी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवनी :— दिनांक ११/०८/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिति मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्‌दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री. रमेश बरकते उपविभागिय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनात पारशिवनी पोलीसांनी सापळा रचत कारवाई केली असता आरोपी नामे कमल सिंह भंवर सिंह, वय ४२ वर्ष, रा. पटेल कॉलनी, रामनगर, विजय नगर, अजमेर, राजस्थान हल्ली मु. बहादुरा तुलसीराम सैनी, पर्ल हेरीटेज सीटी, बहादुरा उमरेड रोड, नागपुर हा दुचाकी होंडा ॲक्टीव्हा मोपेड क्र. एम एच—४०/डी ए—६६४७ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन १३.७४२ किलो ग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती २२,९१३/— रूपये, दुचाकी होंडा ॲक्टीव्हा मोपेड क्र. एम एच—४०/डी ए—६६४७ किंमती ७०,०००/— रूपये असा एकुण ९२,९१३/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक करताना मिळुन आला. **आरोपी नामे कमल सिंह भंवर सिंह, वय ४२ वर्ष, रा. पटेल कॉलनी, रामनगर, विजय नगर, अजमेर, राजस्थान हल्ली मु. बहादुरा तुलसीराम सैनी, पर्ल हेरीटेज सीटी, बहादुरा उमरेड**

**रोड, नागपुर** याचेविरूद्ध पोस्टे पारशिवनी येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद

दिनांक ११/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, दुचाकी वाहन असा एकुण २०,८४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर येथे** आरोपी नामे प्रभाकर चिरकुट भरोसे, वय ५५ वर्ष, रा. पोटगाव, ता. भिवापुर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे शुभम उर्फ आशिक मिलींद बढीये, वय ३० वर्षे, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) राजु भागवत सातपुते, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र ७, नरखेड, ता. नरखेड २) अजय रमेश खडसे, वय ३६ वर्ष, रा. इंदीरा नगर वार्ड क्र. ०४ सावरगाव ता. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे अनिल साहेबराव खडसे, वय ५० वर्ष, रा. भिष्णूर, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) मोहन वासुदेव सनेसर, वय ३९ वर्ष, रा. पारडसिंगा, ता.काटोल, जि. नागपुर २) नंदु शंकरराव धुर्वे, वय ३७ वर्ष, रा. परसोडी, ता. काटोल ३) इशुलाल श्रीराम गलोले, वय ४६ वर्ष, रा. नाग मंदीर जवळ काटोल ४) सुनिल कुमार कुमरे, वय २६ वर्ष, रा. सेलवाडा, ता. घनसोल, जि. सिवनी (मध्यप्रदेश) ५) राजेश अतारसिंग उईके, वय ३४ वर्ष, रा. थुनाकला, ता. सिलोह, जि. सलोह (मध्यप्रदेश) ६) सय्यद आसिफ अली, वय ४१ वर्ष, रा. सावरगाव, ता. नरखेड ७) वासुदेव रामराव कुसराम, वय ४५ वर्ष, रा. लिंगा, ता. काटोल ८) गणेश शेषराव वंजारी, वय ५६ वर्ष, रा. शनी चौक काटोल ९) रोशन पांडुरंग नेहारे, वय ३३ वर्ष, रा. अर्जुन नगर, काटोल १०) मुकुंदा शेषराव कदम, वय ५० वर्ष, रा. सरस्वती नगर, काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे १० गुन्हे नोंद.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**